

२० मे
जागतिक
मधमाशी दिन विशेष

# ‘बसवंत हनी बी पार्क’ मधमाशी पालनाची समग्र माहिती देणारा ‘मधु-प्रकल्प’



**नितीन कराळे**
(मो.नं. ७७७४०८९५१७)
प्रकल्प व्यवस्थापक,
बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र,
मुखेड रोड, पिंपळगाव (बसवंत), ता. निफाड,
जि. नाशिक





मधमाशी संवर्धन आणि मधमाशी पालनाचा सर्वांगीण उपक्रम अशी ‘बसवंत मधमाशी उद्याना’ची ओळख सांगता येईल. पुस्तकी ज्ञानाबरोबरच येथे प्रात्यक्षिकांनाही प्राधान्य दिले जाते. मधमाशी संवर्धन व पालनाच्या उपयुक्ततेविषयी सचित्र माहिती देणारा हा परिसर असून; येथे शेतकरी, विद्यार्थी, युवक आणि उद्योजकांना तज्ज्ञांकडून सखोल मार्गदर्शन मिळते.

'**ग्री**नझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' संचलित तसेच 'पूर्वा केमटेक प्रा.लि.' च्या सहकार्याने 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रा'ची स्थापना मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे करण्यात आली आहे. हे केंद्र नाशिकपासून ३५ कि.मी. अंतरावर आहे. या परिसराची रचना नाविन्यपूर्ण पद्धतीने केलेली आहे. मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्रामध्ये एक, तीन व पाचदिवसीय मधमाशी पालन प्रशिक्षण देण्यात येते. महिन्याच्या प्रत्येक पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रशिक्षणाचे नियोजन केलेले असते. ज्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पूर्ण करून मधमाशी पालन हा व्यवसाय सुरू करायचा आहे त्यांना येथे सर्व प्रकारचे तांत्रिक मार्गदर्शन केले जाते. तसेच या व्यवसायाकरिता लागणारे सर्व साहित्यही उपलब्ध करून दिले जाते. खरं तर मधमाशी पालनाकडे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी पाहिजे त्या पद्धतीने लक्ष दिलेले नाही, त्यामुळे या शेतीपूरक व्यवसायाचा हवा तेवढा विकास झालेला नाही. याचाच विचार करून मधमाशी पालनाबद्दल ग्रामीण व शहरी नागरिक, विद्यार्थी, तरुण आणि शेतकरी यांना आकर्षित करण्यासाठी 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रा'ची उभारणी केली आहे.

**परिसंवादांच्या माध्यमातून प्रबोधन :** महाराष्ट्रात मधमाशी पालन व्यवसायापासून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती व्हावी, या उद्देशाने प्रशिक्षण केंद्रामार्फत डिसेंबर-२०१९ पासून 'मधुक्रांती ' या नावाने राज्यस्तरीय सेमिनार आयोजित करण्यात येत आहेत. ऑक्टोबर- २०२० (ऑनलाईन) तसेच डिसेंबर- २०२१ मध्ये सुद्धा राज्यस्तरीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी, उपक्रमशील युवक व मधमाशी पालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला होता. या क्षेत्रातील मान्यवर तज्ञांनी उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले होते. डिसेंबर- २०२२ मध्ये सुद्धा 'मधुक्रांती २०२२' या नावाने राष्ट्रीय सेमिनार घेण्याचे नियोजन आहे.

या उद्यानामध्ये फिरत असताना मधमाशीच्या उपयुक्ततेबद्दल अनेक बाबींचा खुलासा होतो. मधमाशीबद्दलच्या ज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात भर पडते. मधमाश्यांच्या वसाहती, मधमाश्यांद्वारे प्रत्यक्ष फुलातून मकरंद आणि मध गोळा करण्याचे होणारे कार्य तसेच त्यांच्या एकूणच कार्याची प्रत्यक्ष पाहणी करता येते. शास्त्रीय पद्धतीने मध व इतर उत्पादने प्राप्त करण्यासाठी उपयुक्त असलेली साधने, मधप्रक्रिया प्रकल्प येथे बघावयास मिळतात. अशा प्रकारे उद्यानाद्वारे मधमाशीची संपूर्ण माहिती देणारा देशातील हा पहिलाच प्रकल्प असावा, असे मला वाटते. बसवंत मधमाशी उद्यानामध्ये मधमाशीच्या संदर्भात खूप वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. त्याचप्रमाणे मधमाशी उद्यानामधील विशेष आकर्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

* **तांत्रिक माहिती देणारा टनेल** : यामध्ये आपणास मधमाश्यांचे निसर्गातील व मानवी जीवनातील महत्त्व, मधमाश्यांचा इतिहास, मधमाश्यांची ओळख, त्यांचा जीवनक्रम आणि मधमाश्यांचा खाद्याचा शोध याविषयी माहिती मिळेल.

* **मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्र** : या प्रशिक्षण केंद्रामध्ये एक, तीन व पाचदिवसीय मधमाशी पालन प्रशिक्षणवर्ग आयोजित केले जातात. येथे मधमाशी पालनासंदर्भातील सर्व साहित्य बघायला मिळेल व त्याची माहिती घेता येईल.

* **माहितीपट** : मधमाश्यांचे निसर्गातील महत्त्व चित्रमय स्वरुपात लक्षात येते.

* **प्रदर्शन** : या प्रदर्शनामध्ये मधमाशीच्या संदर्भात







वेगवेगळ्या ६ विषयांवर माहिती मिळते. यामध्ये भारतातील मधमाश्यांच्या जाती, मध व मधाविषयी संपूर्ण माहिती, मधमाशीपासून मिळणारे विविध पदार्थ, परागीभवनाचे महत्त्व आणि मध उत्पादन कशा प्रकारे घेतले जाते हे बघायला मिळते.

* **मधुबनाला भेट** : मधुबनामध्ये मधमाश्यांच्या चार प्रकारच्या प्रजाती बघण्यास व हाताळण्यास मिळतात.

* **मधमाश्यांचे गाव** : येथे एका गावातील चार ते पाच तरुण एकत्र येऊन उत्कृष्टरित्या मधमाशीपालन कसे करू शकतील याचे मॉडेल तयार केले आहे. तसेच शेती उत्पादनात वाढ आणि तरुण पिढीला रोजगार निर्मिती कशी होऊ शकते याबद्दलची माहितीही या गावाच्या माध्यमातून प्रत्यक्ष बघता येईल.

* **विसावा** : विस्तृत असे गार्डन बघता बघता थोडा वेळ या ठिकाणी बसून विश्रांती घेऊन पुढील परिसर बघता येईल.

* **शहरी मधमाशीपालन** : शहरी भागात मधमाशी पालन करून मधमाश्यांचे संवर्धन कशा प्रकारे होऊ शकते हे दाखविण्यासाठी मॉडेल तयार करण्यात आले आहे.

* **पेंटिंग झोन** : आपला छंद व आवड जोपासण्याकरिता लहान मुले, तरुण व वयस्कर यांच्याकरिता बांबू पेंटिंग, स्टोन पेंटिंग, पेपर पेंटिंग व कुंडी पेंटिंग झोन तयार करण्यात आले आहेत.

* **मुलांना खेळण्यासाठी जागा** : येथे लहान मुलांच्या मनोरंजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी लहान मुले विविध प्रकारचे खेळ खेळू शकतात.

* **मधमाश्यांना उपयुक्त रोपवाटिका** (Bee Plant Nursery) : या ठिकाणी मधमाश्यांना उपयुक्त ठरणारी विविध प्रकारची फुलझाडे आपणास बघण्यास मिळतील.


* **फुलांच्या रोपांचे शोरूम** : या शोरूममध्ये विविध प्रकारच्या आकर्षक रंगीबेरंगी फुलझाडांची रोपे ठेवलेली आहेत.

* **मधमाश्यांची पेंटिंग्ज व फोटो गॅलरी** : येथे लहान मुलांनी काढलेली मधमाश्यांची वेगवेगळी चित्रे व फोटो बघण्यास मिळतील.

* **डॉरसाटा पॉईंट** : आग्या मधमाशीचे निसर्गातील महत्त्व; तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची हानी न करता मध कसा काढावा व आग्यामाशीचे संवर्धन कसे करावे याबद्दलची माहिती देणारे शिल्प येथे आहे.

* **स्पेसशिप पॉईंट** : या शिल्पाकृतीच्या माध्यमातून मधमाशीने व्यक्त केलेले मनोगत जाणून घेता येईल.

* **संग्रहालय** : या संग्रहालयामध्ये बांबूपासून तयार



केलेल्या विविध वस्तू बघायला मिळतील. ग्रामीण भागातील बोहाडा संस्कृती व मधमाशी पालनासाठी लागणारे सर्व प्रकारचे साहित्य, त्याचा उपयोग तसेच मधाचे विविध प्रकार येथे आहेत.

* **हनी-बी मूव्ही** : बसवंत मधमाशी उद्यानातील कॉन्फरन्स हॉलमध्ये ॲनिमेटेड हनी-बी मूव्ही दाखविली जाते.

* **सेल्फी पॉईंट** : या ठिकाणी मधमाशीची भव्य प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. आपणाला येथे स्वतः



व संपूर्ण कुटुंबासोबत सेल्फी तसेच विविध फोटो घेता येतील.

**मधमाशी पालन उद्योगासाठी सेवासुविधा:**

मधमाशी पालन व्यवसायाचा विकास होण्यासाठी आवश्यक त्या सर्व सेवासुविधा मिळवून देण्याचा प्रयत्न 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'द्वारे सुरू



आहे. मधमाशी पालनाकरिता लागणारे सर्व साहित्य आणि शेतीमधील पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी परागीभवनाकरिता मधमाश्यांच्या वसाहती येथे उपलब्ध करून दिल्या आहेत. मधमाशी पालनातील सर्व बाबींची माहिती देण्यासाठी याद्वारे मिळणारी उत्पादने व विविध प्रक्रियायुक्त पदार्थ यांचे म्युझियम येथे उभारले आहे.

ज्याप्रमाणे मधमाशी स्वत:चे कार्य करत असताना इतरांच्या उपयोगी पडते आणि कृषी उत्पादनात वाढ करून, शेतकऱ्यांच्या आयुष्यात गोडवा निर्माण करते; तो आदर्श आपणही घ्यावा; असा विचार 'पूर्वा केमटेक' व 'ग्रीनझोन ॲग्रोकेम' यांनी केला. या माध्यमातून मधमाशी पालन व्यवसायाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रा'ची उभारणी केली. याद्वारे शेतकरी आणि एकूणच समाजाला अर्थार्जनाचे माधुर्य लाभावे, याच मुख्य उद्देशाने या सर्व प्रकल्पाची उभारणी करून मधु-संवर्धनासाठी प्रयत्न सुरू आहेत, याला चांगला प्रतिसादही मिळतो आहे.

■



